# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.८७ दिनांक ०९/०९/२०२१

## पालघर पोलीस दलाकडुन "ऑपरेशन ऑल आऊट", जिल्हा अपर पोलीस अधीक्षकांसह ३७ पोलीस अधिकारी व २६१ पोलीस अमंलदारांनी रात्रभर राबविले अभियान, ८२ वाहनधारकांवर गुन्हे दाखल, ४ पाहीजे असलेले आरोपी अटक, ०६ आस्थापनांवर कारवाई, ८१ निगराणी बदमाशांची एकाच वेळी तपासणी.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय शिंदे यांच्या सुचनेप्रमाणे अपर पोलीस अधीक्षक श्री.प्रकाश गायकवाड, याच्या नेतृत्वाखाली, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी २६१ पोलीस अमंलदारांच्या सक्रीय सहभागातुन दिनांक ०८.०९.२०२१ रोजी **"ऑपरेशन ऑल आऊट"** राबविले. सदर अभियानाचा मुख्य उद्देश हा सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व पोलीस अमंलदार हे वरीष्ठ अधिकांऱ्याच्या नेतृत्वाखाली सर्वसमावेशक व आक्रमक कारवाई करुन गुन्हेगांरावर विविध कायद्यातंर्गत परीणामकारक कारवाई करतील. जिल्हयातील गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय शिंदे यांनी सदरचे अभियान राबविण्याचे निश्‍चित केले व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना सविस्तर सुचना दिल्या. सदरचे अभियान हे दिनाक ०८.०९.२०२१ रोजी रात्री ११.०० वाजता सुरु होऊन दिनांक ०९.०९.२०२१ रोजी सकाळी ०५.०० वाजता संपले. हे अभियान एकुण महत्वाच्या ३ टप्प्यामध्ये पार पाडण्यात आले.

i) नाकाबंदी
ii) ॲक्शन टिम/हंटर टिम- कारवाई पथक
iii) कोम्बिंग ऑपरेशन- गुन्हेगार लपण्याच्या वस्त्यामध्ये मोठया संख्येने मनुष्यबळाने जाऊन संपर्ण क्षेत्र पिंजून काढणे व गुन्हेगारांचा शोध घेणे.

सदरचे अभियान पालघर जिल्हयामध्ये प्रथमच अत्यंत प्रभाविपणे राबविण्यात आले. या अभियाना दरम्यान गुन्हेगांरावर वचक निर्माण करण्यासाठी व सर्वसामान्यामध्ये सुरक्षाची भावना निर्माण होण्यासाठी पालघर जिल्हा पोलीस दलाने १६ पोलीस ठाणे हद्दीमध्ये ३२ महत्वाच्या ठिकाणी एकाच वेळी नाकाबंदी लावली होती. तसेच पाहटेच्या वेळी गुन्हेगारांच्या आश्रयस्थान असलेल्या एकुण २२ वस्त्यामध्ये एकाचवेळी कोम्बिंग ऑपरेशन राबविण्यात आले. अत्यंत परिणामकारकपणे झालेल्या या **"ऑपरेशन ऑल आऊट"** मध्ये खालील प्रमाणे महत्वाची कामगीरी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | विवरण | माहती/कारवाई |
|---|---|---|
| १. | अभियानात सहभागी झालेले पोलीस अधिकारी/अमंलदार | अपर पोलीस अधीक्षक - १<br>उप विभागीय पोलीस अधिकारी – ६<br>पोलीस निरीक्षक - ९<br>सहा.पोलीस निरीक्षक - १३<br>पोलीस उपनिरीक्षक – १५<br>पोलीस अमंलदार- २६१ |
| २. | ऑपरेशनची वेळ | दि. ०८/०९/२०२१ रोजी २३.०० वा. ते ०९/०९/२०२१ रोजी सकाळी ०५.०० वाजता |
| ३. | उद्देश | जिल्हयातील सर्व गुन्हेगारांवर कारवाई करणे व कायद्याचा वचक बसविणे |
| ४. | एकुण नाकाबंदी | १६ पोलीस ठाणे हद्दीत ३२ ठिकाणी |
| ५. | एकुण कोम्बिंग ऑपरेशन | १६ पोलीस ठाणे हद्दीत २२ ठिकाणी |
| ६. | तपासलेले हिस्ट्रीशिटर | ८१ |
| ७. | पाहिजे आरोपी | तपासले ५२ पैकी ४ अटक केले |
| ८. | मालमत्तेचे गुन्हे करणारे सराईत गुन्हेगार तपासले | ३५ |
| ९. | वॉरंट/समन्स बजावणी | ४ वॉरंट व ७ समन्सची बजावणी केली. |
| १०. | महाराष्ट्र पो.अधि.कलम ३३ (W), १३१ प्रमाणे केलेली कारवाई | ६ |
| ११. | महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे दाखल गुन्हे | ६ |
| १२. | मोटर वाहन कायदा १९८८ प्रमाणे केलेली कारवाई | ८२ वाहन धारकांवर कारवाई करुन २१,६००/- रुपये किंमतीचा दंड वसूल करण्यात आलेला आहे. |

सदरचे ऑपरेशन हे श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,पालघर यांचे सुचनेप्रमाणे श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले.